| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोननं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

**प्रेसनोट क्रमांक :- ३०६** **दिनांक :-३०/१०/२०२१**

# हायवे व हायवे लगतच्या परिसरात जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन ०५ गुन्हे उघडकीस/ वालीव पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत हायवे व हायवे लगतच्या परिसरात जबरी चोरीचे प्रमाण वाढत असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस आयुक्त व प्रभारी अधिकारी यांनी वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हेप्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळावरील बारकावे, तांत्रिक विश्लेषण, सिसिटीव्ही फुटेज या अनुषंगाने तपास करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

वालीव पोस्टे गु.रजि.नं. I ११४२/ २०२१ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ मधील गुन्हयातील फिर्यादी हे दिनांक ०७/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० वाचे सुमारास सातीवली, गावदेवी तलावाचे जवळुन पायी फोनवर बोलत जात असतांना मोटर सायकल वरुन आलेले दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन पळुन गेले. सदर आरोपीत यांचा गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेऊन आरोपीत १) रुपेश इद्रजित यादव, वय-१९ वर्षे, रा. ता.वसई जि.पालघर, २) मोहम्मद शोहेब मेराजऊद्दीन शेख वय ३६ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता.वसई जि.पालघर, ३) अकबर अली अलीमुद्दीन शेख वय- ३५ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता.वसई जि.पालघर, यांना अटक करुन आरोपीत यांचे कडुन वालीव पोलीस ठाण्यातील जबरी चोरीचे ५ गुन्हे उघड करुन ७९,०००/- रुपये किंमतीचा मुदेदमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**वालीव पोलीस ठाण्याकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहे.**

| अनु.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नंबर |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. ११४२/२०२१ भादविंसं कलम ३९२,३४ |
| २ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. १०११/२०२० भादविंसं कलम ३९२,३४ |
| ३ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. ११४४/२०२१ भादविंसं कलम ३९२,३४ |
| ४ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. १००८/२०२१ भादविंसं कलम ३९२,३४ |
| ५ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. ९६२/२०२१ भादविंसं कलम ३९२,३४ |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, श्री. कैलास बर्वे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक वालीव पोलीस ठाणे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, योगेश देशमुख, पोना. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, पो.शि. विनेश कोकणी, गजानन गरीबे सर्व नेमणुक वालीव पोलीस ठाणे यांनी केली आहे.

---------oooooo----------